7

मौजे नांदिवली तर्फे पाचानंद, स.नं.८५/१४, क्षेत्र १२३७.५० चौ.मी.
क्र.महसुल/क-१/टे-७/सनद/एसआर क्र.१३/२०२०

# जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय, ठाणे

परिशिष्ट "ब"

**महाराष्ट्र जमीन महसुल संहिता १९६६ च्या कलम ४२-अ (१) (अ) मधील तरतुदींन्वये नियोजन प्राधिकरणाने बांधकाम / विकास परवानगी दिली आहे, अशा जमिनीच्या भोगवटादारांस द्यावयाची सनद**

---

वाचले :-

१. श्रीम.जाई गजानन पाटील, रा.नांदिवली तर्फे पाचानंद, ता.कल्याण, जि.ठाणे यांचा सनद मिळणेकामीचा अर्ज दि.२९/१०/२०२०

२. कनिष्ठ अभियंता, कल्याण-डोंबिवली, महानगरपालिका, कल्याण यांचेकडील पत्र जा.क्र.कडोंमपा/नरवि/९७, दि.९/०४/२०१९ व पत्र जा.क्र.कडोंमपा/नरवि/१३१५, दि.२५/११/२०२० रोजीचा झोन दाखला

३. अर्जदार यांनी बिगरशेतकी आकारणीच्या पाचपट रक्कम रु.५३८५/- रुपांतरीत कर (कन्व्हर्शन टॅक्स) व वार्षिक अकृषिक आकारणी रक्कम रु.१०७७/- मात्र अशी एकूण रक्कम रु.६४६२/- होत असून, अर्जदार यांनी तहसीलदार कल्याण यांचेकडील पत्र क्र./महसुल/टे-२/जमीनबाब-१/रुपांतरणकर/एसआर-२३३/२०१९, दि.२१/०९/२०१९ अन्वये रक्कम रु.७८०/-, चलन क्र.GRN MH00 6441245 201920M, दि.२१/०९/२०१९, तसेच रुपांतरीत कर व वार्षिक अकृषिक आकारणी फरकाची रक्कम रु.५६८२/-, चलन क्र.GRN MH0 10033840 202021M, दि.१२/०१/२०२१ व सन २०२०-२१ या वर्षाची वार्षिक अकृषिक आकारणी रक्कम रु.१०७७/-, चलन क्र.GRN MH0 10034193 202021M, दि.१२/०१/२०२१ अन्वये शासन जमा

४. अर्जदार यांनी सादर केलेले दि.२९/१०/२०२० रोजीचे शपथपत्र व बंधपत्र

५. अर्जदार यांनी सादर केलेले दि.०३/११/२०२० रोजीचे सह खातेदारांचे संमत्तीपत्र

६. महाराष्ट्र शासन, महसुल व वन विभाग यांचेकडील अद्यादेश क्र.१७, दि.२२ ऑगस्ट २०१४

७. महाराष्ट्र शासन, महसुल व वनविभाग यांचेकडील शासन निर्णय क्र.एनएपी-२०१६/प्र.क्र.७/टी-१, दि.२२/०१/२०१६

८. महाराष्ट्र शासन राजपत्र दि.५/०१/२०१७ व या कार्यालयाकडील परिपत्रक दि.१६/०३/२०१७

९. महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम १९६६चे कलम ४२ अ व ४२ ब

---

ज्या अर्थी, श्रीम.जाई गजानन पाटील यांनी जिल्हा ठाणे तालुका कल्याण, गांव नांदिवली तर्फे पाचानंद येथील खालील जमिनीच्या भोगवटादाराने महाराष्ट्र जमीन महसुल संहिता, १९६६ च्या कलम ४२-अ व ४२-ब च्या तरतुदींन्वये रहिवास या अकृषिक प्रयोजनासाठी सदर जमिनीचा विकास करण्यास कनिष्ठ अभियंता, कल्याण-डोंबिवली, महानगरपालिका, कल्याण यांचेकडील पत्र जा.क्र.कडोंमपा/नरवि/९७, दि.९/०४/२०१९ व पत्र जा.क्र.कडोंमपा/नरवि/१३१५, दि.२५/११/२०२० रोजीचे डिपी रिमार्क व झोन दाखला या सनदेसोबत संलग्न आहे.

जमिनीचा ७/१२ नुसार तपशिल

| अ. क्र. | गावाचे नाव | स.नं/ हि.नं. | क्षेत्र (चौ.मी.) | जमिनीचा वर्ग | गाव नमुना नंबर ७/१२ नुसार असणारे भोगवटादाराचे नाव | इतर हक्कातील नोंदी, व जमिनीवरील भार |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | नांदिवली तर्फे पाचानंद ता.कल्याण | ८५/१४ | २९५०.०० पैकी १२३७.५० | वर्ग-१ | जाई गजानन पाटील<br>चिराग गजानन पाटील<br>सुरज गजानन पाटील | अकृषिक वापर-रहिवास (गावठाणाबाहेरील) १२३७.५० चौ.मी. एवढे क्षेत्र अकृषिक प्रयोजनाकरीता |

ज्याअर्थी उक्त जमिनीच्या भोगवटादाराने शासनाला, उक्त संहितेच्या कलम ४७-अ नुसार देय रुपांतरण कराची रक्कम रु.५३८५/- रुपांतरीत कर (कन्व्हर्शन टॅक्स) व वार्षिक अकृषिक आकारणी रक्कम रु.१०७७/- मात्र अशी एकूण रक्कम रु.६४६२/- होत असून, अर्जदार यांनी तहसीलदार कल्याण यांचेकडील पत्र क्र./महसुल/टे-२/जमीनबाब-१/रुपांतरणकर/एसआर-२३३/२०१९, दि.२१/०९/२०१९ अन्वये रक्कम रु.७८०/-, चलन क्र.GRN MH00 6441245 201920M, दि.२१/०९/२०१९, तसेच रुपांतरीत कर व वार्षिक अकृषिक आकारणी फरकाची रक्कम रु.५६८२/-, चलन क्र.GRN MH0 10033840 202021M, दि.१२/०१/२०२१ व सन २०२०-२१ या वर्षाची वार्षिक अकृषिक आकारणी रक्कम रु.१०७७/-, चलन क्र.GRN MH0 10034193 202021M, दि.१२/०१/२०२१ अन्वये शासन भरणा केली आहे.

त्याअर्थी आता, उक्त संहितेमधील तरतुदीच्या आणि तदन्वये करण्यात आलेल्या नियमांच्या तरतुदींना आणि खालील शर्तींना अधिन राहून उपरोक्त जमिनीच्या भोगवटादारांस सदर नियोजन प्राधिकाऱ्यांच्या वर उल्लेखित विकास /.बांधकाम परवानगीच्या अनुषंगाने सदर जमिनीवर अनुज्ञेय करण्यात आलेल्या अकृषिक वापरासाठी उक्त संहितेच्या कलम ४२-अ अन्वये ही सनद देण्यात येत आहे.

१) आकारणी : उक्त जमिनीचा भोगवटादार उक्त जमिनीच्या संबंधात या अगोदर वसुली योग्य असलेल्या आकरणी ऐवजी वर उल्लेखित विकास / बांधकाम परवानगी प्राप्त झाल्यापासून दि.३१ जुलै २०२१ रोजी संपणाऱ्या हमीच्या कालावधीत शासनाला प्रत्येक वर्षी रहिवास प्रयोजनार्थ रु.पै.०-८७ प्रति चौ.मी. या दराने क्षेत्र १२३७.५० चौ.मी. या क्षेत्राची परिगणित होणारी वार्षिक आकारणी देईल आणि उक्त कालावधी संपल्यानंतर, उक्त संहिते अन्वये जिल्हाधिकाऱ्याकडून, वेळोवेळी निश्चित करण्यात येईल, अशी सुधारीत देईल.

२) उक्त जमिनीचा भोगवटादार उक्त जमिनीवर वसुली योग्य असलेले सर्व कर, दर आणि उपकर भरील.

३) वरील प्रमाणे मंजूर केलेल्या वापरामध्ये किंवा वापराच्या क्षेत्रामध्ये नियोजन प्राधिकरणाच्या पुर्व मंजूरीशिवाय कोणताही बदल करु नये व ही सनद निर्गमित झाल्यानंतर नियोजन प्राधिकरणाच्या पुर्व मान्यतेने सदर जमिनीच्या वापरामध्ये किंवा वापराच्या क्षेत्रामध्ये कोणताही बदल झाल्यास त्याची माहिती, असा बदल नियोजन प्राधिकरणाकडून मंजूर झाल्यापासून ३० दिवसांच्या आत जिल्हाधिकारी यांना देणे भोगवटादारांवर बंधनकारक राहील.

४) उक्त जमिनीची मोजणी करुन मोजणीच्या अनुषंगाने अभिलेख दुरुस्ती करुन घेणे अनुज्ञाग्राही यांचेवर बंधनकारक राहील.

५) प्रस्तावित जमिनीचे नगररचनाकार (डों.वि.), कल्याण-डोंबिवली, महानगरपालिका, कल्याण यांचेकडून बांधकाम आराखडे मंजूर करुन घेणे तसेच त्यानंतरच मंजूर बांधकाम आराखडयानुसार बांधकाम करणे अर्जदार यांचेवर बंधनकारक राहील.

६) उक्त सनदेनंतर सदरची जमीन सनदेत नमुद कारणास्तव शेती प्रयोजनाकडून अकृषिक प्रयोजनाकडे वर्ग समजणेत येईल.

७) उक्त जमिनीच्या भोगवटादाराने पुर्वगामी शर्तीपैकी कोणत्याही शर्तीचे उल्लंघन केल्यास जिल्हाधिकाऱ्यास, उक्त संहितेच्या आणि तद्न्वये करण्यात आलेल्या नियमांच्या तरतुदींअन्वये जी भरण्यास उपयोगकर्ता दायी असेल अशी इतर कोणत्याही शास्तीस बाधा न आणता त्यास योग्य वाटेल अशी आकारणी भरल्यावर आणि कलम ३२९(२)च्या अधिनतेने, त्यास योग्य वाटेल एवढा दंड भरल्यावर उक्त जमीन भोगवटादार यांच्या वहिवाटीत असण्याचे चालु ठेवता येईल.

८) सदरची सनद हि महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६चे कलम १५७चे तरतुदीनुसार आजरोजीचे अभिलेखावरुन देणेंत येत आहे. सदरचे मिळकती बाबतचे कोणतेही अभिलेख अथवा फेरफार हे कोणत्याही सक्षम न्यायालयाने रद्द केल्यास सदर सनद ही आपोआप रद्द झाली असे समजणेत येईल व याकरिता कोणतेही स्वतंत्र आदेश काढणेची आवश्यकता राहणार नाही.

त्याची साक्ष म्हणुन ठाणे जिल्हयाच्या जिल्हाधिकाऱ्यांनी / जिल्हाधिकाऱ्याने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याने या ठिकाणी महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या वतीने स्वाक्षरी केली आहे आणि त्यांच्या पदाची मोहोर लावली आहे आणि अर्जदाराने सुध्दा दिनांक ०७/०१/२०२१ रोजी त्याची स्वाक्षरी केलेली आहे.

(भोगवटादाराचे नाव व स्वाक्षरी)

अ) श्रीम.जाई गजानन पाटील

(साक्षीदारांच्या स्वाक्षऱ्या व पदनामे)

१) श्री. आनंद काशिराम मोरे

२) श्रीम. मनिषा मनोहर मोरे

आम्ही जाहीर करतो की, ज्याने या सनदेवर स्वत: अमुक अमुक म्हणुन स्वाक्षरी केलेली आहे ती, अ ही व्यक्ती तिच आहे आणि त्याने या ठिकाणी आमच्या समक्ष त्याची स्वाक्षरी केलेली आहे.

तहसीलदार (महसुल)

क्र.महसुल/क-१/टे-७/सनद/एसआर-१३/२०२०
जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे
दिनांक 1 FEB 2021

(राजेश ज. नार्वेकर)
जिल्हाधिकारी ठाणे

प्रत :- श्रीम.जाई गजानन पाटील, रा.नांदिवली तर्फे पाचानंद, ता.कल्याण, जि.ठाणे
प्रत :- आयुक्त, कल्याण-डोंबिवली, महानगरपालिका, कल्याण यांचेकडे माहितीसाठी
प्रत :- तहसीलदार कल्याण यांचेकडे माहितीसाठी रवाना.
प्रत :- उप अधीक्षक, भुमि अभिलेख, कल्याण यांचेकडे माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
२/- प्रकरणी अनुज्ञाग्राही यांचेकडून मोजणी फी शासन जमा करुन मोजणीची योग्य ती कार्यवाही करावी.
प्रत :- तलाठी सजा आयरे, ता.कल्याण यांचेकडे माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
प्रत :- कार्यालयीन संचिका

(राजेश ज. नार्वेकर)
जिल्हाधिकारी ठाणे